**प्रेसनोट                    दिनांक १५/०८/२०१९**

## विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर

## दाखल गुन्हयातील २ आरोपींना अटक करुन गुन्हा उघडकिस आणला

दिनांक १२/०८/२०१९ रोजी इसम नामे परवेझ आलम रहेमानी वय २१ वर्षे रा. बौध विहार जवळ, गुडडु खान यांची चाळ, कलवडवस्ती लोहगाव पुणे यांनी विमानतळ पोलीस स्टेशन येथे हजर होवुन फिर्याद दिलेत मजकुर की, दिनांक ११/०८/२०१९ रोजी रात्रौ ९/१५ वा.चे सुमारास फिर्यादी व घरमालक गुडडु खान असे नजीर अहमद खान याला त्याचे बहिणीशी बोलत नाही असे समजावुन सांगण्यास त्यांचे घरी गेलो असताना आरोपी १. नजीर अहमद खान २.कुतुबुददीन जैनुददीन खान ३.शाबुददीन खान यांनी त्या गोष्टीचा राग मनात धरुन फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन, आरोपी नजीर अहमद खान याने फिर्यादीचे डोक्यात दगड मारुन जखमी केलेले आहे अशी तक्रार दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर ३१९/२०१९ भा.दं.वि कलम ३२४,३२३.५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. दाखल गुन्हयातील  आरोपींचे ठावठिकाणां बाबत पोलीस उप निरीक्षक श्री गिरी, पोलीस नाईक किरण पडयाळ यांनी माहीती काढुन दिनांक १२/०८/२०१९ रोजी आरोपी नामे १. कुतूबुददीन जैनुददीन खान वय ५५ वर्षे रा. पांडेनगर,कलवडवस्ती लोहगांव पुणे. २. नजीर अहमद खान वय १८ वर्षे रा. सदर यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे गुन्हयाचातपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना पोलीस उप निरीक्षक श्री गिरी यांनी १८/५० वाजता अटक करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक गिरी विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत.

(राजेंद्र पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर